**नि.फौ.ख.क्र. ५२/२०१५**
सरकार – वि.- सुनील पानीकर
**निशाणी क्र. २२**

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ -</u>**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – शेखर नाथुराम जाधव - टिपण
वय – ५० वर्षे, व्यवसाय – आरक्षक, रेसुब शिवाजीनगर,
सध्या रा. - देहुरोड, पुणे.

**<u>फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम २९९ प्रमाणे, सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए. एस. काळे यांचे मार्फत सुरु-</u>**

सन २०१५ मध्ये माझी नेमणुक रेसुब कार्यालय, देहुरोड येथे आरक्षक या पदावर होती. दि. १५/०१/२०१५ रोजी माझी नेमणुक अपराध रोकथाम या पथकात पुणे रेल्वे स्टेशनवर होती. माझे सोबत प्रधान आरक्षक हरीशचंद्र पोकर व प्र.आरक्षक राहुल काकडे हे देखील होते. त्यादिवशी रात्री १०.३० वाजता प्लॅटफॉर्म क्र. १ वरती असताना आम्हाला बुर्कींग कार्यालयाजवळ चोर-चोर असा आवाज ऐकु आला. आम्ही पाहिले की, एक व्यक्ती पळुन जात आहे. आम्ही त्यास पकडले. त्यावेळी दुसरा व्यक्ती मागुन तेथे आला व त्याने आम्हाला सांगितले की, सदरच्या व्यक्तीने त्याचे मोबाईल व पाकीट चोरले आहे. आम्ही चौकशी केली असता आरोपीने त्याचे नाव सुनील शशीधर पानीकर असे सांगितले. ज्या व्यक्तीचे पाकीट व मोबाईल चोरले होते त्या व्यक्तीने त्याचे नाव मनोजकुमार चंद्रभान शहा असे सांगितले. आरोपीने त्याच्याकडे मोबाईल व पाकीट असल्याची कबुली आम्हाला दिली. त्यानंतर आरोपीस मुददेमालासह पुढील कारवाई करीता लोहमार्ग पोलीस स्टेशन, पुणे यांचेकडे सुपूर्त केले. फिर्यादीने त्यानंतर फिर्याद दिली. आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकतो. तो आज रोजी न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पुर्ण .**

**<u>आरोपी हा फरार असल्याने उलटतपास नाही.</u>**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.05.14 17:21:26 +0530

दि. १४/०५/२०२६
स्थळ - पुणे

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.